Dhanlaxmi Shikshan Sanstha

# SSK ARTS & COMMERCE COLLEGE

(Affiliated to Savitribai Phule Pune University)

SSK Campus, Wadzire, Tal: Sinnar, Dist: Nashik, 422102

**Unipune ID :** PU/NS/AC/144 (2009) **PUNCODE :** CAAN018760 **AISHE CODE :** C-41304

Ref. Date : / /20

**3.3.1 - Number of research papers published per teacher in the Journals notified on UGC care list during the last five years**

3.3.1.1. **Number of research papers in the Journals notified on UGC CARE list year wise during the last five years**

HEI Input :

| 2021-22 | 2020-21 | 2019-20 | 2018-19 | 2017-18 |
|---|---|---|---|---|
| 0 | 0 | 1 | 4 | 0 |

## Findings of DVV

1. HEI is requested to provide the data session wise in the prescribed data template.
2. Please provide the required details in the prescribed data template, as the blank column should not be considered.
3. Please provide the Cover page, content page and first page of the selected publication to be sealed and signed by the head of the institute.
4. Kindly note that only UGC care listed entries be considered in this metric.

## HEI Response:

Session wise data are as follows

| 2021-22 | 2020-21 | 2019-20 | 2018-19 | 2017-18 |
|---|---|---|---|---|
| 0 | 0 | 1 | 3 | 0 |

Enclosed :

Research Papers of Teachers

SSK ARTS & COMMERCE COLLEGE ★ NAIGAON ★ OFFICE

Principal
Sahakarmitra Shivajirao Katkade
Arts & Commerce College,
Naigaon,Tal.Sinnar (Nasik)

# भारती विद्यापीठ
# अभिमत विश्वविद्यालय, पुणे

नॅक द्वारे पुर्नमुल्यांकनात 'A+' दर्जा प्राप्त
केंद्र सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे 'A' दर्जा प्राप्त

Estd. 1964
Celebrating 75 and Beyond
BHARATI VIDYAPEETH
Founder Chancellor : Dr. Patangrao Kadam

## अभिजीत कदम इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड सोशल सायन्सेस, सोलापूर

आयोजित

मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

## मराठी अर्थशास्त्र परिषदेचे 43 वे राष्ट्रीय अधिवेशन

# अर्थभारती

स्मरणिका २०१९-२०



# अर्थभारती स्मरणिका

## मराठी अर्थशास्त्र परिषदेचे 43 वे राष्ट्रीय अधिवेशन


✻ **प्रकाशक**

स्थानिक कार्याध्यक्ष

**डॉ. व्हि.एस. मंगनाळे**
संचालक, अभिजीत कदम इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट
अ‍ॅन्ड सोशल सायन्सेस, सोलापूर

स्थानिक कार्यवाह

**डॉ. पी.पी. कोठारी**
व्यवस्थापन विभाग प्रमुख,
अभिजीत कदम इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट अ‍ॅन्ड सोशल सायन्सेस, सोलापूर

स्थानिक सहकार्यवाह

**डॉ. ए.बी. नदाफ**
संगणक विभाग प्रमुख,
अभिजीत कदम इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट अ‍ॅन्ड सोशल सायन्सेस, सोलापूर

✻ **मुद्रक**

**श्री. नागेश शेंडगे**
व्हिजन ग्राफिक्स, सोलापूर.


- सदर पुस्तकात भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय, पुणे, अंतर्गत अभिजीत कदम इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट अ‍ॅन्ड सोशल सायन्सेस सोलापूर तर्फे आयोजित करण्यात आलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४३ व्या राष्ट्रीय अधिवेशनात संशोधकांची प्रस्तुत केलेल्या शोधनिंबधाच्या गोषावऱ्यांचे संकलन करण्यात आले आहे.

- या पुस्तकात शोधनिंबधात व्यक्त केलेली मते त्या त्या लेखकाची आहेत तसेच सदर शोधनिंबध अथवा त्यातील मजकुर या अधी अन्यत्र कुठे प्रसिध्द झाले असल्यास त्याचा संस्था, विश्वविद्यालय, इन्स्टिटयुट, संचालक, संपादक, प्रकाशनक, मुदक्र यांच्याशी काही संबंध असणार नाही त्याची सर्वेस्वी जबाबदारी लेखकाची असेल.

# अर्थभारती

स्मरणिका

## मराठी अर्थशास्त्र परिषदेचे 43 वे राष्ट्रीय अधिवेशन

दि. ३१ ऑक्टोंबर, ०१ व ०२ नोव्हेंबर २०१९

संपादक


**डॉ. एम.के. पाटील**

प्राध्यापक, संगणक विभाग

अभिजीत कदम इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड
सोशल सायन्सेस सोलापूर


आयोजक

**भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय, पुणे**

नॅक द्वारे पुर्नमुल्यांकनात 'A+' दर्जा प्राप्त
केंद्र सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे 'A' दर्जा प्राप्त

**अभिजीत कदम इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट**
**ॲन्ड सोशल सायन्सेस, सोलापूर**

प्रायोजक

Indian Council of
Social Science Research

**भारतीय सामाजिक विज्ञान**
**संशोधन परिषद, दिल्ली**

# अनुक्रमाणिका

## विषय १ - महात्मा गांधींच्या आर्थिक विचारांची समर्पकता


| क्र. | शोध निंबध | शोध निंबध लेखक | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| १ | महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार | डॉ. पुजारी अल्लप्पा धरेप्पा | १ |
| २ | महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार | डॉ. रमजान फत्तु खान मुजावर | २ |
| ३ | महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार | डॉ. संजय पांडुरंग पाटील<br>प्रा. कुशल अनिल चौधरी | ३ |
| ४ | महात्मा गांधीचे विचार | श्री मुरलीधर पंडित गायकवाड | ४ |
| ५ | महात्मा गांधी यांच्या आर्थिक विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता | प्रा. जे. एस. इंगळे | ५ |
| ६ | महात्मा गांधी यांच्या आर्थिक विचारांची उपयुक्तता | डॉ. राजेंद्र शिवयोगी शिरसी | ६ |
| ७ | महात्मा गांधीजींचे आर्थिक विचारातील योगदान | प्रा. धनपुने सोनल वसंतराव | ७ |
| ८ | महात्मा गांधीच्या ' खेड्याकडे चला' या विचारांची वर्तमान भारतीय अर्थव्यवस्थेतील गरज | डॉ. संजय पांडुरंग पाटील<br>प्रा. महाजन प्रवीण भास्कर | ८ |
| ९ | गांधी सर्वसमावेश शाश्वत विकासची साधने - ससर्वोदय व सहकार | प्रा. प्रवीण पी. डांगे<br>डॉ. विजय ए. पाटील | ९ |
| १० | महात्मा गांधीच्या आर्थिक विचारांची समर्पकता | प्रा. नलिनी विठ्ठल पाचर्णे | १० |
| ११ | महात्मा गांधीच्या आर्थिक विचारांची समर्पकता | डॉ. एस. एच . कडेकर<br>डॉ. डी. बी. मोरे | ११ |
| १२ | महात्मा गांधीच्या आर्थिक विचारांची समर्पकता | डॉ. हिरालाल वामन चव्हाण | १२ |
| १३ | महात्मा गांधीच्या आर्थिक विचारांची समर्पकता | डॉ. कल्पना भजनी | १३ |
| १४ | महात्मा गांधीच्या आर्थिक विचारधारेची समर्पकता | डॉ. माधुरी लेले | १४ |
| १५ | महात्मा गांधीच्या आर्थिक विचारांची समर्पकता | डॉ. करमसिंग रा. राजपूत<br>डॉ. एम. बी. ठिकरे | १५ |
| १६ | महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांची वर्तमानकालीन उपयुक्तता | डॉ. राहुल शं . म्होपरे | १६ |
| १७ | महात्मा गांधीच्या आर्थिक विचारांची वर्तमान परिस्थितीशी समर्पकता | प्रा. हेमंत अनिल जोशी | १७ |
| १८ | महात्मा ग्रामविकासाची संकल्पना व सद्यस्थिती | डॉ. विठ्ठल घिनमिने | १८ |
| १९ | गांधीजींच्या दृष्टिकोनातून महिला सक्षमीकरण | कु. संगीता बोरसे<br>डॉ. सुभाष पाटील | १९ |
| २० | भ्रष्टाचारासंदर्भात म. गांधीजींच्या विचारांची समर्पकता | डॉ. अविनाश कुलकर्णी | २० |

# महात्मा गांधींच्या ‘‘खेड्याकडे चला’’ या विचारांची वर्तमान भारतीय अर्थव्यवस्थेतील गरज


प्रा. डॉ. संजय पांडुरंग पाटील
आजीव स. क्र. १००३
अर्थशास्त्र विभाग,
प.खा.भ.सेवा. मंडळ संचालित
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय
देवपुर, धुळे – ४२४००५
Mo. No. – 99421437570
Email Id : drsanjaykhairnar@gmail.com

प्रा. महाजन प्रविण भास्कर
आजीव स.क्र. १७५५
अर्थशास्त्र विभाग,
सहकारमित्र शिवाजीराव कातकाडे कला आणि
वाणिज्य महाविद्यालय नायगाव ता. सिन्नर
जि. नाशिक
Mo. No. – 9921244002
Email Id: pravin.mahajan93@gmail.com


**प्रस्तावना :**

मोहनदास करमचंद्र गांधी यांचा जन्म गुजरात मधील पोरबंदर येथे २ ऑक्टोबर १८६९ रोजी झाला. १८९१ मध्ये इग्लंड मधुन बॅरिस्टरचे शिक्षण घेऊन आले. परंतु भारतात बॅरिस्टरच्या व्यवसाय करण्यात ते त्यांचा लाजाळू स्वभावामुळे अयशस्वी झाले. त्यानंतर त्यांनी २१ वर्षे दक्षिण आफ्रिकेत बॅरिस्टरच्या व्यवसायाच्या माध्यमात वर्ण भेदाचा अन्यायाशी संघर्ष केला. मोहनदास करमचंद्र गांधी १९१५ मध्ये दक्षिण आफ्रिकेतुन भारतात आले, भारतात आल्या नंतर भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसच्या कार्यात सहभागी झालेत. १९२० मध्ये लोकमान्य टिळकांचा मृत्युनंतर भारतीय स्वातंत्र्य संग्रामात गांधी युगाला सुरूवात झाली. मोहनदास करमचंद्र गांधी यांना रविंद्रनाथ टागोर यांनी सर्व प्रथम महात्मा संबोधले. महात्मा गांधी यांनी सत्याग्रह, अहिंसा, असहकार, स्वदेशी या तत्वांचा भारतीयामध्ये प्रचार आणि प्रसाराचा साहयाने स्वातंत्र्य प्राप्त करून दिले. महात्मा गांधीचे विचारांचा भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीमध्ये सिंहाचा वाटा आहे, त्याच प्रमाणे वर्तमानकालीन भारतीय अर्थव्यवस्थेतील समस्या सोडविण्यासाठी उपयोगी आहेत.

महात्मा गांधी हे अर्थशास्त्राचे अभ्यासक नव्हते तर कायद्याचे अभ्यासक होते. म्हणून महात्मा गांधींचे विचार हे अर्थशास्त्राच्या परिभाषेत नसून महात्मा गांधी यांनी भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात नेतृत्व करत असताना भारतीय लोकांना दिलेल्या संदेशात आर्थिक विचार मांडलेले आहेत. यामध्ये स्वदेशीचा नारा, सर्वोदय चळवळ, चरखा आणि खेड्याकडे चला या विचाराचा समावेश करता येईल. या विचारामुळेच स्वातंत्र प्राप्ती मिळविण्यास मदत झाली. स्वातंत्र्य प्राप्तीच्या ७० वर्षानंतर ही देशातील आर्थिक समस्या सोडविण्यासाठी महात्मा गांधींचे विचारांची गरज आहे. महात्मा गांधीच्या विचारांमधील एक महत्त्वाचा आर्थिक विचार म्हणजे ‘‘खेड्याकडे चला’’ हा विचार देशातील विविधा आर्थिक समस्या सोडविण्यासाठी कसा आवश्यक आहे याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न सदर लघुशोध निबंधात करण्याचा प्रयत्न केला आहे.

भारताने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आर्थिक विकास साध्य करण्यासाठी औद्योगिककरणाचा स्वीकार केला. औद्योगिकरणामुळे आर्थिक विकास झाला. परंतु औद्योगिकरणामुळे वाढत्या शहरीकरणाची समस्या निर्माण झाली. वाढत्या शहरीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणावर विविध समस्या निर्माण झाल्या आहेत. या समस्यांमध्ये प्रादेशिक विषमता, मलनिस्सारणाची समस्या, शहरातील जमिनींच्या वाढत्या किंमती, कृषी क्षेत्राच्या विकासाकडील दुर्लक्ष, शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे पायाभूत सेवा सुविधांवरील ताण, शहरातील वाढती गुंडागर्दी, ओस पडणारी खेडी, शहरात मानव मूल्यांचा होणारा ऱ्हास या

समस्यांचा उल्लेख करता येईल. या वर्तमानकालीन समस्यांवर महात्मा गांधींचा ''खेड्याकडे चला'' हा विचार उपाय ठरू शकते.

**उद्दिष्टे :**

सदर लघुशोधप्रबंधात वर्तमानकालीन भारतीय अर्थव्यवस्थेत महात्मा गांधींचा ''खेड्याकडे चला'' या विचारांची गरज या विषयाचा अभ्यास करणे हा आहे.

**खेड्याकडे चला या महात्मा गांधींच्या विचारांची गरज का आहे ? याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.**

**१. ग्रामीण लोकसंख्येचे अधिक प्रमाण :**

१९५१ च्या जनगणनेनुसार भारतीय लोकसंख्येच्या ८२.७० टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर उद्योगाच्या आणि सेवा क्षेत्राचा विकासामुळे शहरी लोकसंख्येचे प्रमाण वाढण्यास सुरुवात झाली. तरीही ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण २०११ च्या जनगणनेनुसार ६८.८० टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास होती. म्हणजेच वर्तमान स्थितीत शहरी लोकसंख्येपेक्षा ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे.
परंतु या अधिक प्रमाण असलेल्या लोकसंख्येला भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास लाभ मिळण्याचे प्रमाण कमी आहे. म्हणून वर्तमान काळात भारतीय अर्थव्यवस्थेत महात्मा गांधींचा ''खेड्याकडे चला'' या विचारांची गरज आहे.

**२.शेतीचे भारतीय अर्थव्यवस्थेतील स्थान :**

सन १९५०—५१ या वर्षी राष्ट्रीय उत्पन्नात शेती क्षेत्राचा वाटा ५६.५० टक्के होता, तर स्वातंत्र्यप्राप्तीनंतर २०१७—१८ या वर्षामध्ये तो १७.१० टक्के इतका झाला आहे. इंग्लंड (२ टक्के) ऑस्ट्रेलिया (६ टक्के) आणि अमेरिका (३ टक्के) या विकासित देशांच्या तुलनेत आजही भारताच्या अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राचे योगदान अधिक महत्त्वपूर्ण आहे. परंतु भारतीय शासनकर्त्यांनी आर्थिक विकास साध्य करण्यासाठी औद्योगिक आणि सेवा क्षेत्राकडे अधिक लक्ष दिलेले आहे आणि शेती क्षेत्राकडे मात्र दुर्लक्ष केलेले आहे. याचा परिणाम म्हणून शेती क्षेत्राचा वृद्धी दर २०१७—१८ या वर्षी २.१ टक्के इतका अल्प होता. तर याच कालावधीमध्ये उद्योग क्षेत्राचा ४.४ टक्के आणि सेवा क्षेत्राचा वृद्धी दर ८.३ टक्के इतका होता. म्हणजेच उद्योग क्षेत्राचा आणि सेवा क्षेत्राचा वृद्धीदर शेती क्षेत्राच्या वृद्धीदरापेक्षा अधिक आहे. म्हणून महात्मा गांधीच्या खेड्याकडे चला या विचारांच्या माध्यमातून शेती क्षेत्राचा विकास साध्य करून अर्थव्यवस्थेतील शेतीचे महत्त्व कायम राखता येईल.

**३. बेकारीची समस्या कायम :**

भारत हा देश लोकसंख्येच्या दृष्टीकोनातून जगात दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. परंतु भांडवलाच्या अभावाने औद्योगिकरणाचा वेग कमी आणिा औद्योगिक क्षेतातील वाढते यांत्रिकीकरण इत्यादी कारणांनी बेकारीची समस्या अधिक उग्र स्वरुप धारण करीत आहे. उद्योग आणि सेवा क्षेत्राचा विकास हा बेकारीची समस्या

सोडविण्यासाठी पुरेसा नाही. तर शेती आणि ग्रामीण क्षेत्रातील लघु उद्योगांचा विकासाचा त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करण्यात वाटा आहे.

**४. शहरातील वाढत्या समस्या :**

भारतात उद्योग आणि सेवा क्षेत्राचा विकास झाल्यामुळे शहरी भागात मोठ्याप्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्यामुळे खेड्यातून मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होवून शहरांची लोकसंख्या अधिक प्रमाणात वाढली आहे. या वाढत्या लोकसंख्येला सामावून घेणे शहरातील पायाभूत सेवा सुविधांना शक्य होत नाही. म्हणून शहरात पिण्याच्या पाण्याची समस्याा, वाहतुकीची कोंडी, सांडपाणी व्यवस्थापन, घरांच्या वाढत्या किंमती इत्यादी समस्याा शहरी भागात मोठ्याप्रमाणात निर्माण झाल्या आहेत.

**५. ओस पडणारे खेडी :**

शहरी भागात मोठ्याप्रमाणावर रोजगार निर्मिती झाल्यामुळे ग्रामीण भागातून नागरीकांचे स्थलांतर झाले आहे. या ग्रामीण भागातून नागरीकांचे स्थलांतरामुळे खेडे ओस पडू लागली आहेत. शेती व्यवसायासाठी शेतमजुरांची टंचाई निर्माण होऊ लागली आहे. खेडी ओस पडू लागल्यामुळे ग्रामीण भागातील भारतीय संस्कृती लुप्त होऊ लागली आहे. ओस पडणारी खेडी आणि लुप्त होणारी भारतीय संस्कृती या समस्या सोडविण्यासाठी महात्मा गांधींचा खेड्याकडे चला हा विचार उपयोगी ठरू शकतो.

**६. प्रादेशिक विषमता :**

उद्योग आणि सेवा क्षेत्राचे काही विशिष्ट भागात केंद्रिकरण झाल्यामुळे भारतात प्रादेशिक विषमता मोठ्या प्रमाणावर निर्माण झाली आहे. उदा. पश्चिम महाराष्ट्र आणि पूर्व महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रादेशिक विषमता मोठ्या प्रमाणावर निर्माण झाली आहे. कारण पश्चिम महाराष्ट्रात उद्योगाचा विकास अधिक झाला आहे, तर पूर्व महाराष्ट्रात उद्योगाचा आणि शेती क्षेत्राचा विकास झालेला नाही. म्हणून पूर्व महाराष्ट्रातील शेती क्षेत्राचा पर्यायाने खेड्यांचा विकास करून प्रादेशिक असमतोल दूर करता येईल. यासाठी खेड्याकडे चला या महात्मा गांधींच्या विचारांची आज नितांत गरज आहे.

**महात्मा गांधींच्या खेड्याकडे चला या विचारात वर्तमान समस्या सोडविण्यासाठी अभिप्रेत असलेले घटक पुढीलप्रमाणे आहेत.**

**१. भारतीय शेतीचा विकास :**

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी हरितक्रांतीचा यशस्वी प्रयोग केला गेला. परंतु कृषी क्षेत्राचा सर्वांगीण विकास करण्यात ते अपयशी ठरले आहे, हरित क्रांतीच्या प्रयोगातील उणिवांचा शोध घेवून पुन्हा नविन हरितक्रांतीचा प्रयोग करणे आवश्यक आहे. या हरित

क्रांतीच्या प्रयोगामध्ये नदी जोड प्रकल्प कार्यान्वीत करणे आणि कृषी विपणनातील दोष दूर करून शेती क्षेत्राचा विकास करणे आवश्यक आहे. शेती क्षेत्राचा विकास झाला तर ग्रामीण भागातून होणारे नागरीकांचे स्थलांतर थांबविता येईल. यामुळे भारतातील खेडी समृद्ध होतील.

**२. ग्रामीण उद्योगांचा विकास :**

भारतात ब्रिटिशांच्या आगमनापूर्वी ग्रामीण उद्योग हे विकसित होते, परंतु ब्रिटिशांचा प्रतिकूल धोरणामुळे ग्रामीण उद्योग बंद पडले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अवजड उद्योगांना अधिक महत्त्व देण्यात आले. ग्रामीण उद्योगाकडे एकप्रकारे दुर्लक्ष करण्यात आले. परंतु भारतातील बेरोजगारीची समस्या सोडविण्यासाठी ग्रामीण उद्योगांचा विकास केला तर बेरोजगारीची समस्या सोडविण्यास मदत होईल. कारण ग्रामीण उद्योग हे श्रम प्रधान तंत्राचा वापर केल्याने अधिक रोजगार संधी निर्माण होतील.

**३. स्वयंपूर्ण खेड्यांची निर्मिती :**

खेड्यात आरोग्य, शिक्षण आणि इतर आवश्यक सुविधा आणि रोजगाराच्या संधी अशी स्वयंपूर्ण खेड्यांची निर्मिती केल्यास शहराकडे ग्रामीण भागातून होणारे स्थलांतर बंद होऊन शहरीकरणाच्याही समस्या कमी होण्यास मदत होईल.

**''खेड्याकडे चला'' हा महात्मा गांधींचा विचार स्वीकारण्यात पुढील अडचणी आहेत.**

**१. शेती म्हणजे जुगार ही समजूत :**

भारतीय शेती वर्तमान स्थितीमध्ये एक जुगाराचा खेळ झाली आहे, म्हणजे शेतीमध्ये गुंतवणूक केल्यानंतर किती परतावा मिळेल याची कोणतीही शाश्वती नाही असा समज निर्माण झाला आहे. त्यामुळे आपल्या शेतीच्या उत्पन्नावर कुटुंबाचा उदरनिर्वाहासाठी अवलंबून राहणे ग्रामीण भागातील नागरीकांसाठी अव्यवहारिक आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरीक शहरातील उद्योग व सेवा क्षेत्रातील रोजगाराला प्राधान्य देत आहेत. त्यामुळे शेतीच्या उत्पन्नाची शाश्वतीसाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.

**२. शहरी जीवनाचे आकर्षण :**

ग्रामीण भागातील लोकांना शहरी जीवनाचे आकर्षण असल्याने ग्रामीण भागातून नागरीकांचा मोठ्याप्रमाणावर शहराकडे येण्याचा कल अधिक आहे.

**संदर्भ :**

१. डॉ. राणी जैन, २०१२, ***इतिहास थोर व्यक्तींचा***, निकता पब्लिकेशन, लातूर

२. ***केंद्रिय आर्थिक सर्व्हे***, २०१७–१८

३. डॉ. आर. के. दातीर आणि इतर, २०१०, ***भारतीय अर्थव्यवस्था***, निराली प्रकाशन, पुणे.

४. प्रा. डॉ. राजेंद्र अ. रसाळ, २०१३, ***भारतीय अर्थव्यवस्था***, सक्सेस प्रकाशन, पुणे.

५. डॉ. किरण जी. देसले, २०१५, ***आर्थिक व सामाजिक विकास***, दिपस्तंभ प्रकाशन, जळगाव.

# महात्मा गांधीच्या "खेडयाकडे चला" या विचारांची वर्तमान भारतीय अर्थव्यवस्थेतील गरज

प्रा. डॉ. संजय पांडुरंग पाटील
आजीव स. क्र. १००३
अर्थशास्त्र विभाग,
प.खा.भ.सेवा. मंडळ संचालित
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय
देवपुर, धुळे – ४२४००५
Mo. No. – 99421437570
Email Id : drsanjaykhairnar@gmail.com

प्रा. महाजन प्रविण भास्कर
आजीव स.क्र. १७५५
अर्थशास्त्र विभाग,
सहकारमित्र शिवाजीराव कातकाडे कला आणि
वाणिज्य महाविद्यालय नायगाव ता. सिन्नर
जि. नाशिक
Mo. No. – 9921244002
Email Id: pravin.mahajan93@gmail.com

**गोषवारा :**

मोहनदास करमचंद्र गांधी यांचा जन्म गुजरात मधील पोरबंदर येथे २ ऑक्टोबर १८६९ रोजी झाला. १८९१ मध्ये इग्लंड मधुन बॅरिस्टरचे शिक्षण घेऊन आले. परंतु भारतात बॅरिस्टरच्या व्यवसाय करण्यात ते त्यांचा लाजाळू स्वभावामुळे अयशस्वी झाले. त्यानंतर त्यांनी २१ वर्षे दक्षिण आफ्रिकेत बॅरिस्टरच्या व्यवसायाचा माध्यमात वर्ण भेदाचा अन्यायाशी संघर्ष केला. मोहनदास करमचंद्र गांधी १९१५ मध्ये दक्षिण आफ्रिकेतुन भारतात आले, भारतात आल्या नंतर भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसच्या कार्यात सहभागी झालेत. १९२० मध्ये लोकमान्य टिळकांचा मृत्युनंतर भारतीय स्वातंत्र्य संग्रामात गांधी युगाला सुरूवात झाली. मोहनदास करमचंद्र गांधी यांना रविंद्रनाथ टागोर यांनी सर्व प्रथम महात्मा संबोधले. महात्मा गांधी यांनी सत्याग्रह, अहिंसा, असहकार, स्वदेशी या तक्त्वाचा भारतीयामध्ये प्रचार आणि प्रसाराचा साहयाने स्वातंत्र प्राप्त करून दिले. महात्मा गांधीच्या विचारांचा भारताचा स्वातंत्र्य प्राप्तीमध्ये सिंहाचा वाटा आहे, त्याच प्रमाणे वर्तमानकालीन भारतीय अर्थव्यवस्थेतील समस्या सोडविण्यासाठी उपयोगी आहेत.

महात्मा गांधी हे अर्थशास्त्राचे अभ्यासक नव्हते तर कायद्याचे अभ्यासक होते. म्हणून महात्मा गांधीचे विचार हे अर्थशास्त्राचा परिभाषेत नसुन महात्मा गांधी यांनी भारताच्या स्वातंत्र संग्रामात नेतृत्व करीत असताना भारतीय लोकांना दिलेल्या संदेशात आर्थिक विचार मांडलेले आहेत यामध्ये स्वदेशीचा नारा, सर्वोदय चळवळ, चरखा आणि

खेडयाकडे चला या विचाराचा समावेश करता येईल. या विचारामुळेच स्वातंत्र प्राप्ती मिळविण्यास मदत झाली. स्वांतत्र प्राप्तीच्या ७० वर्षांनंतर ही देशातील आर्थिक समस्या सोडविण्यासाठी महात्मा गांधीचे विचारांची गरज आहे. महात्मा गांधीच्या विचार मधील एक महत्त्वाचा आर्थिक विचार म्हणजे "खेडयाकडे चला" हा विचार देशातील विविध आर्थिक समस्या सोडविण्यासाठी कसा आवश्यक आहे. याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न सदर लघुशोध निबंधात करण्याचा प्रयत्न केला आहे.

भारतात ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण स्वातंत्र्य प्राप्ती नंतर १९५१ च्या जनगणेनुसार लोकसेख्येच्या ८२.७ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास होती तर २०११च्या जनगणेनुसार ६८.८ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास आहे. परंतु या मोठया प्रमाणावर असलेल्या लोकसंख्येला स्वातंत्र प्राप्तीचा त्यांचा संर्वागिण विकासासाठी लाभ झालेला नाही. दुस—या बाजुला स्वातंत्र्य प्राप्ती नंतर आर्थिक विकासासाठी उद्योग आणि सेवा क्षेत्राचा विकास करण्याचा प्रयत्नात निर्माण झालेल्या शहरी भागात सुध्दा मोठया प्रमाणावर समस्या निर्माण झालेल्या आहेत. तर बेरोजगारी समस्या दिवसेंदिवस अधिक बिकट स्वरूप धारण करीत आहे. या सर्व समस्या महात्मा गांधीच्या विचारातील एक महत्त्वाचा विचार “खेडयाकडे चला” हा विचार उपाय ठरू शकतो...

“खेडयाकडे चला” या महात्मा गांधीचा विचारात अभिप्रेत असलेले उपाय म्हणजे भारतीय शेतीच्या विकास ग्रामीण उद्योगाचा विकास आणि स्वयंम पुर्ण खेडयाची निर्मिती होय. परंतु या उपायाचा अंमलबजावणी शेती म्हणजे जुगार ही वास्तव स्थिती आणि शहरी जीवनाचे ग्रामीण लोकांना असलेले आकर्षण ही होय.

International Inventive Multidisciplinary Journal
An International Peer reviewed Refereed Journal ISSN : 2348-7135

# A Study of Personality Integration in Sportsperson and Non-sportsperson of Nashik District

**Mr. Bhavik Mankodi**
B.P.E., B.P.Ed., M.P.Ed.
Research Scholar- Sant Gadhge Baba Amravati University, Amravati

**Abstract**

*The objective of the study is to find out personality integration in sportsperson and non-sportsperson of nashik district. To conduct the study 100 male sports person and 100 male non-sports person were selected as sample. Age of the subject is between 18 to 25 years. Five Dimensional Emotional Maturity Scale prepared by Singh and Bhargava (1990) was used to analyse personality integration of the subjects. The results indicate that personality integration of the male sportsperson is superior as compared to non-sportsperson. It was concluded that competitive sports as a medium are useful in developing integration personality in non-sportsperson population.*

## Introduction

Need of individual, nations or to that matter is different from each other but the importance of integrated personality is the same for an individual, nation or a society. Personality integration is the process of firmly unifying the diverse elements of an individual's motive and dynamic tendencies, resulting in harmonious co-action de-escalation inner conflict (English and English, 1958). Without an integrated personality, a person lives in the past or dreaming of future and the present seems to be forgotten. A man with character and well-being is a blessing to mankind but a man without character cause trouble and misery to the whole of the society. To develop personality integration, one way is to gain knowledge and training of our physical and mental system in an integrated way. Numerous studies have shown that sports participation is an excellent medium to development overall well-being. That is way quite few researcher namely Weiss and Bebko (2008), Zarandi (2011), Bakhshyesh (2012) have focused their attention on role of sports on various psychological factor such as mental health, self-esteem, anxiety etc. It is surprising that personality integration among non-sportsperson people

has not been studies in the context of participation in sports. To fill this void, the presents study was planned.

To solve above mentioned purpose, single hypothesis has been vid. Personality integration among sports person subjects will significantly vary according to their participation/non-participation in sports.

**Purpose of the study:**

"The main purpose of the study was to determine the "A Study of Personality Integration in Sportsperson and Non-sportsperson of Nashik District''.

**Methodology**

**Sampling Method**

The simple random sampling was applied to select the subjects for this study.

**Source of Data**

The data pertaining to this study were collected from Nashik district.

**Selection of Subject**

The researchers select the 200 subjects. (100 Sportsperson and 100 Non-Sportsperson.)

**Tools**

Emotional Maturity Scale prepared by Singh and Bhargava (1990) was used to assess personality integration of sports person and non-sportsperson subjects. This inventory is highly and valid. Lower the score, higher the personality integration is the direction of scoring.

**Procedure**

EMS (1990) was administrated to selected sports person and non-sports person subjects as per their convenience and availability. Response related with personality integration dimension was scored off according to author's manual, afterwards obtained data tabulated to their respective groups.

**Results and Findings**

The finding of the study were shown in the following tables-

**Table 1:**

Shows statistical comparison of personality integration between male sportsperson and Non-sportsperson of nashik district

| Variable | Sportsperson (N-100) | | Non-sportsperson (N-100) | | Mean Diff. | 't' Ratio |
|---|---|---|---|---|---|---|
| | M | SD | M | SD | | |
| Emotional Maturity | 18.86 | 4.40 | 20.62 | 4.48 | 1.76 | 3.95 |

***Significant at .01 level***

A closer look at the entries reported in table 1 indicate that integrated personality was observed in significantly higher magnitude (M=18.86) as compared to non-sportspersons (M=20.62). the calculated t=3.95 which is statistically significant at 0.01 level confirms the above because the lower mean scores denoted higher level of personality integration as per direction of the scoring system.

The psychology of the person is to be so trained that he finds meaning in pursuing the pleasure of life and wealth through righteousness in spiritual illumination. The secret of success in life is will-power, determination, concentration and goal oriented motivation. All these characteristics make integration personality. In the past it has been scientifically proved that participation in sports can be used as a medium for overall personality development in a normal population [Kandhivaran (2011), Singh and Ball (2012)]. Hence the results of the present study once again reiterate the positive role of sports in personality development even in sportsperson.

**Conclusion**

On the basis of results and finding, it was conclude that participation in sports as a therapy can boost personality integration of non-sportsperson.


**References**

Bakhshyesh, S.; Bahmani, F. And Kamali, M. (2012). Comparative of Mental Health Disabled People pf Athletic and Non-Athletic. IJWPH. 2012; 5 (1):22-26.

Cocquyt, M. And Sigmund, E. (2011). The impact of competition in physical activity and sport on the self-perception of individuals with physical disabilities. Acts Univ. Palacki., Gymn. Vol. 4, No. 1, 43-50.

# Intellectual Property Rights :

## Nature and Problems




**Editors**

Dr. Jayashri M. Nemade

Dr. Satish Jadhav

Dr. Hiralal Chavan



Prashant

# Intellectual Property Rights : Nature and Problems

© Reserved

**Publisher & Printer**

Rangrao A Patil | Prashant Publications

3, Pratap Nagar, Dynaneshwar Mandir Road, Near Nutan Maratha College,
Jalgaon 425 001. Ph: 0257-2235520, 2232800.

Web: www.prashantpublication.com Email: prashantpublication.jal@gmail.com

Edition: February, 2019 ISBN: 9789388769396 Price: ₹ 295/-

Cover Design / Typesetting: Prashant Publications

Disclaimer: The authors are solely responsible for the contents of the papers compiled in this volume. The publishers or editors do not take responsibility for the same in any manner. Errors if any are purely unintentional and readers are requested to communicate such error to the editors or publishers to avoid discrepancies in future.

All rights reserved. No part of this publication shall be reproduced, stored in a retrieval system or transmitted, in any form or by any means, electronic, mechanical, photocopying (zerox copy), recording or otherwise, without the prior permission of the Publishers.

12. Protection of Geographical Indication in Maharashtra : An overview of the Indian Legislation and the TRIPS Scenario....106
- Prof. Kotkar Sagar Raghunath
13. बौद्धिक संपदा – स्वरूप, आव्हाणे आणि संधी.........................115
– प्रा. विलास अंकुशराव सोळुंके
14. बौद्धिक संपदा हक्क : स्वरुप आणि समस्या.........................124
– प्रा. डॉ. प्रशांत ब्रिजलाल सोनवणे
15. बौध्दिक संपदा अधिकार– स्वरूप आणि अडचणी यात माध्यमांची भुमिका.........................132
– रविंद्र रामदास स्वामी
16. बौद्धिक संपदा अधिकारांचे स्वरूप.........................140
– डॉ. जयश्री बी. पाटील
17. बौद्धिक संपत्ती अधिकाराचे स्वरूप.........................146
– डॉ. दिनेश साहेबराव खंडारे
18. बौद्धिक संपत्ती अधिकार : स्वरुप आणि समस्या.........................151
– प्रा. डॉ. सुरेश हिलाल पाटील
19. बौद्धिक संपदा अधिकाराचे फायदे व तोटे.........................156
– प्रा. डॉ. संजय व्ही. भामरे
20. बौद्धिक संपदा अधिकार आणि त्याचे प्रकार यांचा संकल्पनात्मक अभ्यास.........................163
– डॉ. विजयानंद अभिमन वारडे
21. भारत आणि बौद्धिक मालमत्ता अधिकार.........................169
– डॉ. मुरलीधर पंडित गायकवाड
22. भारतातील बौध्दिक संपदा हक्काची सद्यस्थिती एक अध्ययन.............178
– प्रा.डॉ. संजय पांडुरंग पाटील, प्रविण भास्कर महाजन
23. बौद्धिक संपदा हक्क आणि जैविक तंत्रज्ञान.........................188
– डॉ. हिरालाल वामन चव्हाण
24. बौद्धिक संपदा आणि भौगोलिक विशेषतादर्शक चिन्ह.........................200
– प्रा. डॉ. किशोर एच. नेहेते
25. व्यापारी चिन्ह : एक बौद्धिक संपदा.........................205
– डॉ. श्रीकांत सुभाषचंद्र चौधरी

# भारतातील बौध्दिक संपदा हक्काची सद्यस्थिती एक अध्ययन

**प्रा.डॉ. संजय पांडुरंग पाटील**
अर्थशास्त्र विभाग
प.खा.भ.सेवा.मंडळ संचलित कला व वाणिज्य महिलामहाविद्यालय, देवपुर, धुळे.
**प्रविण भास्कर महाजन**
संशोधक, अर्थशास्त्र विभाग
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

**प्रस्तावना :**

अर्थशास्त्रामध्ये उत्पादनाचे भुमी, श्रम, भांडवल, संयोजक या चार घटकांचा उल्लेख केला जातो. परंतु १९९१ नंतर माहिती तंत्रज्ञानाचा विकासामुळे बौध्दिकसंपदा हा उत्पादनाचा पाचवा घटक म्हणून ओळखला जाऊ लागल्या मुळे भांडवल प्रधान उत्पादन तंत्र आणि श्रम प्रधान उत्पादन तंत्र या सोबत ज्ञानाधिष्ठीत उत्पादन तंत्र हे नविन उत्पादन तंत्र विकसित झाले आहे. स्पर्धेचा युगात टिकण्यासाठी व विकसित होण्यासाठी उद्योगांना परंपरागत मालमत्ते बरोबरच बौध्दिक संपदांची आवश्यकता वाटु लागली. त्या बौध्दिक संपदाना कायदेशीर अधिकार प्राप्त करुन घेण्याचे चढाओढ सुरु झाली, यासोबत असे अधिकार असणे आणि वाढविणे हे उद्योगाच्या विकासाचा मंत्र होऊ लागला. बौध्दिक संपदा अधिकार हा केवळ एका देशापर्यंत मर्यादित न राहता त्यांना जागतिक मान्यता देण्याची प्रकिया सुरु झाली. या अधिकारांपासुन होणारा अर्थिक लाभ जागतिक पातळीपर्यंत पोहचला. विकसित देशांना बौध्दिक संपदा अधिकाराचे फायदे अगोदर लक्षात आल्याने त्यांनी आपल्या देशामध्ये त्यानुसार कायद्याची रचना केली. विकसनशील देशांना यांचे लाभ उशिरा लक्षात आल्याने ते देश बौध्दिक संपदा हक्काबाबत मागसलेले दिसुन येत आहेत. तर विकसित देश बौध्दिक संपदा अधिकाराच्या जोरावर मोठ्या प्रमाणारावर उद्योगात प्रभुत्व निर्माण करुन अर्थिक लाभ मिळवत आहेत. आंतरराष्ट्रिय व्यापाराच्या विकासासाठी निर्माण करण्यात आलेल्या, जागातिक व्यापार संघटना आणि (ट्रिप्स) करारानंतर विकसनशील देशांना बौध्दिक संपदा हक्काकडे अधिक व्यापक दृष्टीकोणात पाहण्याची आवश्यकता निर्माण झाली.

बौध्दिक संपदा हक्कांची आवश्यकता का निर्माण झाली. या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला असता आपणास असे लक्षात येते की, एकदा नवीन शोध लावणे, नवीन वस्तु शोधणे, वस्तु निर्मितीची नविन प्रक्रिया शोधून काढणे, एखादी

नवीन कलाकृती शोधून काढणे या कार्यासाठी संशोधकाला मोठ्या प्रमाणावर अर्थिक गुंतवणूक, वेळ, ज्ञान, परिश्रम खर्च करावे लागतात. त्यानंतर नवीन शोध, कलाकृती निर्माण होत असते. नवीन शोधासाठी संशोधकांने केलेल्या त्यागाचा मोबदला मिळण्यासाठी, या नवीन संशोधनाचा समाजाला/देशाला योग्य लाभ मिळण्यासाठी आणि संशोधनाला चालना देण्यासाठी कायदेशीर तरतुदीच्या आवश्यकतेतुन बौध्दिक संपदा हक्कांची निर्मिती झाली आहे.

बौध्दिक संपदा या नवीन संकल्पनेमुळे एकूणच उद्योग क्षेत्रात संशोधनाला चालना मिळण्यास मोठी मदत झाली.

**उद्दिष्ट्ये :**

सदर लघुशोध निबंध पुढील उद्दिष्ट्यांनी प्रेरित आहे.

१. बौध्दिक संपदा हक्क कायद्याच्या उत्क्रांती अभ्यासणे.
२. भारतातील बौध्दिक संपदा हक्कांची सध्य स्थितीचा अभ्यास करणे.
३. भारत बौध्दिक संपदा हक्क बाबत मागासलेला असल्यास त्यांची कारणे शोधणे.

**गृहित कृत्ये :**

१. भारतात बौध्दिक संपदा हक्क बाबत जनजागृतीचा अभाव आहे.
२. भारतातील बौध्दिक संपदा निर्माण करण्यास प्रतिकुल वातावरण आहे.

**संशोधन पध्दती :**

सदर लघु शोधनिबंधात भारतातील बौध्दिक संपदा हक्काची स्थितीचा अभ्यास करीत असतांना संपूर्ण माहिती दुय्यम स्त्रोतामधून घेतली आहे, यात विविध संदर्भ पुस्तके, शासनाचे अहवाल, मासिके, इंटरनेट व वर्तमान पत्रे इत्यादीचा वापर करुन दुय्यम माहिती मिळवली आहे. या माहितीच्या आधारे -

**संकल्पना :**

१. **बौध्दिक संपदा :** मानवी मनाच्या व बुध्दीच्या मदतीने निर्माण झालेली मालमत्ता म्हणजे बौध्दिक संपदा होय.
२. **बौध्दिक संपदा हक्क :** शोध कर्त्याने/प्रवर्तकाने निर्माण केलेल्या बौध्दिक संपदेच्या अर्थिक आणि इतर लाभ मिळण्याची कायदेशीर तरतुद म्हणजे बौध्दिक संपदा हक्क होय.

३. **पेटंट :** बौध्दिक संपदा हक्काबाबत नोंदणी शोध कर्त्यास/प्रवर्तकास इतरांना साधारणत: वीस वर्षाच्या मर्यादित काळासाठी शोध, वापर, विक्री आणि आयात करण्यापासून इतरांना वगळण्याचा अधिकार म्हणजे पेटंट होय.

**बौध्दिक संपदा हक्काची गरज :**

जेम्स वॅट या शास्त्रतज्ञाने वाफेचा इंजिनचा शोध लावला. या शोधामुळे यत्रंणा गती प्राप्त होऊन इंग्लंड मध्ये औद्योगिक क्रांती झाली. या आद्योगिक क्रांती मोठ्या प्रमाणावर औद्योगिक उत्पादनात वाढ होऊन एकूण समाजाचे राहणीमान उंचावले, नविन शोधामुळे समाजाचा आणि देशाचा विकास होत असतो, म्हणून नविन शोध लागणे फायदेचे असते. परंतु नविन शोध घेण्यासाठी ज्या व्यक्ती बौध्दिक संपदा, पैसा, वेळ आणि श्रम खर्च करतात त्यासाठी प्रेरणा मिळणे आवश्यक असते. ही प्रेरणा शासन बौध्दिक संपदा हक्कांचा माध्यमातुन अर्थिक आणि इतर लाभ मिळण्याच्या हमी देत आहे.

**बौध्दिक संपदा हक्काची उत्क्रांती :**

बौध्दिक संपदा हक्कांचा वर्तमान स्थिती कायदा खालील कायद्याचे उत्क्रांत स्वरुप आहे . त्यामुळे या कायद्याचा आढावा घेणे आवश्यक आहे. बौध्दिक संपदा हक्क कायद्यांची उत्क्रांती पुढीलप्रमाणे आहे.

| वर्ष | बौध्दिक संपदा हक्काच्या कायद्यातील उत्क्रांती |
|---|---|
| १४७४ | बौध्दिक संपदा हक्का बाबत जगात पहिला कायदा सर्व प्रथम इटली मध्ये करण्यात आला. याच कायद्यानुसार नवीन शोधून काढले उपकरण प्रत्यक्षात उपयोगात आणल्या नतर रिपब्लिक ऑफ व्हेनिसला कळविणे बंधनकारक होते. त्यामुळे त्या प्रवर्तकाचा हक्काचे उल्लंघन करणाऱ्या पासून संरक्षण मिळू शकेल. |
| १६२३ | इंग्लड मध्ये मक्तेदारी कायदा करण्यात आला. या कायद्यानुसार विशिष्ठ वस्तुचे उत्पादन किवा विशिष्ट सेवाचा पुरवठा करण्या संबंधी मक्तेदारी अधिकार देणारे पेटंट्चे पत्र दिले जात असे. |
| १७९० | या वर्षी अमेरिकेने पेटंट कायदा पास केला. |
| | भारतातील बौध्दिक संपदा हक्कांची उत्क्रांती |

| वर्ष | बौध्दिक संपदा हक्काच्या कायद्यातील उत्क्रांती |
|---|---|
| १८५६ | भारत १८५६ मध्ये ब्रिटिश सामाज्यचा भाग असल्याने ब्रिटिश पॉर्लमेंटने केलेला कायदा हा भारतासाठी बंधनकारक होतो, यानुसार १८५६ मध्ये ब्रिटिश पॉर्लमेंटने संशोधना आधारित संशोधन कर्त्याला नवीन उत्पादना करण्या बाबत सुरक्षा प्रदान करणारा कायदा संमत केला हा कायदा भारतालाही लागू होता. |
| १८५९ | १८५६ मध्ये ब्रिटिश पॉर्लमेंटने संमत केलेल्या कायद्यातील उणीवा दुर करणारा नवीन कायदा संमत करण्यात आला. |
| १८७२ | १८७२ मध्ये ब्रिटिश पॉर्लमेंटने पेटंटस ॲण्ड डिझाईन प्रोटेशन ॲक्ट या नावाने कायदा केला. |
| १८८३ | इन्व्हेन्शन ॲक्ट या नावाने कायदा संमत केला. |
| १८८८ | इन्व्हेन्शन व डिझाइन्स ॲक्ट या नावाने कायदा केला. |
| १९११ | १९११ मध्ये इंडियन पेटंट्स ॲण्ड डिझाईस या नावाने नवीन कायदा करण्यात आला, या कायद्याने अगोदरच्या सर्व कायद्याची जागा घेतली. |
| | स्वातंत्र्य भारतातील बौध्दिक संपदा हक्कांची उत्क्रांती |
| १९७२ | स्वातत्र्य प्राप्ती नंतर १९९११ च्या कायदया वर अधिक विचार मंथन होऊन 'भारतीय पेटंट कायदा १९७०' या नावाने कायदा संसदेने केला. |
| १९९९ | मार्च २६, १९९९ ला पेटंट (दुरुस्ती) कायदा करण्यात आला. |
| २००२ | २००२ ला पुन्हा पेटंट कायद्यात दुरुस्ती करण्यात आली. |
| २००५ | पेटंट (दुरुस्ती) कायदा करण्यात आला. हा कायदा १ जानेवारी २००५ पासुन लागु करण्यात आला. |

या प्रमाणे बौध्दिक संपदा हक्क या कायद्याची उत्क्रांती होत आहे.

**बौध्दिक संपदा हक्कांचे वर्गीकरण :**

जागतिक बौध्दिक संपदा संघटनेने बौध्दिक संपदा हक्काचे पुढील घटकांमध्ये वर्गीकरण केले आहे.

१) पेटंट

२) कॉपीराइट (लेखाधिकार)

३) ट्रेडमार्क (व्यापार चिन्ह)
४) औद्योगिक संकल्पचित्र
५) भोगोलिक विशेषता दर्शक चिन्ह
६) कामगिरी हक्क
७) गोपनिय माहिती आणि व्यापार गुप्तता इत्यादी.

**बौध्दिकसंपदा हक्कांबाबत भारताची स्थिती :**

ज्या युरोपियन देशांना आपण आज बौध्दिक संपदा बाबातीत संपन्न म्हणून वर्तमान स्थितीत ओळखतो त्या युरोपियन खंडातील मानव जेव्हा रानटी अवस्थेत जीवन जगत होता. त्या कालावधीत भारतीय व्यक्ती हा वेदांचा अभ्यास करत असल्याच्या भारताच्या इतिहास आहे. वर्तमान स्थितीत बौध्दिक संपदा हक्कांबाबत भारताची स्थिती जाणून घेण्यासाठी घेण्यासाठी भारत देशांचा शेजारी असलेला आणि अर्थिक, सामाजिक, लोकसंख्येबाबत तुलना केली जाते, तसेच येणाऱ्या भविष्यात भारत महासत्ता होण्याचा स्पर्धेतील मुख्य स्पर्धक असलेला देश म्हणजे चीन होय. या देशाची बौध्दिक संपदा हक्कांबाबत तुलना करुन भारताची वर्तमान स्थितीचे विश्लेषण केले आहे. या विश्लेषणासाठी जागतिक बौध्दिक संपदा हक्क संघटनेकडे बौध्दिक संपदा हक्कांचा घटकांचा नोंदणीचा २००८ ते २०१७ या कालवधीतील तपशीलाचा विचार केला आहे.

**पेटंट नोंदणीची स्थिती :**


मानव निर्मित बस्तु उत्पादने, वस्तु निर्मिती प्रक्रिया, विक्री इत्यादी साठी शोधकर्त्यास पेटंट नोंदणीमुळे आर्थिक आणि इतर लाभाचे संरक्षणाची हमी मिळते. २००८ ते २०१७ या कालावधीतील भारत आणि चीन या देशातील पेटंट नोदणीची स्थिती पुढील तक्त्यात दर्शविली आहे.

**तक्ता क्र. – पेटंट नोंदणीची स्थिती**

| वर्ष | भारताची पेटंट नोंदणी | चीनची पेटंट नोंदणी |
|---|---|---|
| २००८ | ११५४६ | २०४२६८ |
| २००९ | ११९३९ | २४१४३४ |
| २०१० | १४८६९ | ३०८३२६ |
| २०११ | १५८९६ | ४३६१७० |

| वर्ष | भारताची पेटंट नोंदणी | चीनची पेटंट नोंदणी |
|---|---|---|
| २०१२ | १८२०२ | ५६१४०८ |
| २०१३ | २०९०८ | ७३४०१६ |
| २०१४ | २२४४५ | ८३७८१७ |
| २०१५ | २३९९० | १०१०६१५ |
| २०१६ | २५९३७ | १२५७४०१ |
| २०१७ | २७९८५ | १३०६०११ |

संदर्भ : https://www.wipo.int/ipstats/en/statistics/country_profil




वरील तक्ता आणि आलेखावरुन असे निदर्शनास येते की, भारताचे २००८ या वर्षी ११५४६ पेटंट नोदणी आहे. तर चीन मधील पेटंट नोंदणी २०४२६८ एवढी झाली आहे. २००८ या वर्षी भारतापेक्षा चीनची पेटंट नोदणी अधिक आहे.

तसेच २००८ ते २०१७ या कालावधीत भारत आणि चीन या दोन्ही देशातील पेटंट नोंदणीत वाढ झाली, परंतु चीन पेटंट नोंदणीचे प्रमाण भारतापेक्षा खुप अधिक आहे.

**व्यापार चिन्ह नोंदणीची स्थिती :**

एखाद्या उत्पादकांची किवा विक्रेत्याची वस्तु किवा सेवा इतरांपासुन वेगळी ओळखता येणे सहज शक्य होईल. यासाठी चित्रात दाखविता येणारी एखादी खूण किवा चिन्ह म्हणजे व्यापार चिन्ह (ट्रेड मार्क) होय. या व्यापार चिन्हाच्या व्यवसायात एक नावलौकिक निर्माण विक्री वाढ करुन मोठ्या प्रमाणावर नफा

मिळवितो. २००८ ते २०१७ या कालावधीतील भारत आणि चीन या देशातील व्यापार चिन्ह नोदणीची स्थिती पुढील तक्त्यात दर्शविली आहे.

**तक्ता क्र.२ : व्यापार चिन्ह नोंदणी दर्शक तक्ता**

| वर्ष | भारताचे व्यापार चिन्ह नोंदणी | चीनची व्यापार चिन्ह नोंदणी |
|---|---|---|
| २००८ | १४२५९० | ६७३५२२ |
| २००९ | १५३९३८ | ८३८०७१ |
| २०१० | १९०३२६ | १११३१२० |
| २०११ | १९४७९६ | १४४५११६ |
| २०१२ | १९७८७७ | १६९४०२४ |
| २०१३ | २०४९८७ | १९४०९०८ |
| २०१४ | २३७२४४ | २४२२०८४ |
| २०१५ | २८३३४६ | ३१००३१२ |
| २०१६ | २९४५२६ | ४१९३६२४ |
| २०१७ | २७१९७२ | ६३८१५१२ |

आलेख क्र.२ : व्यापार चिन्ह नोंदणी दर्शक आलेख

वरील तक्ता आणि आलेखवरुन असे स्पष्ट होते की, २००८ या वर्षी भारतातून १४२५९० इतक्या व्यापार चिन्हाची तर चीन मधून ६७३५२२ एवढ्या व्यापार चिन्हांची नोंदणी झालेली आहे. २००८ मध्ये भारतापेक्षा अधिक चारपटी पेक्षा जास्त व्यापार चिन्हांनाची नोंदणी केलेली आहे.२००८ ते २०१७ या दहा वर्षाचा कालावधीत दोन्ही देशाचा व्यापार चिन्हांचा नोंदाणीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असली तरी भारततून व्यापार चिन्हांचा नोदणीचे प्रमाण चीन तुलनेने अत्यंत अल्प आहे.

**औद्योगिक संकल्पचित्र :**

ग्राहक जेव्हा वस्तु खरेदी करण्याचा निर्णय घेत असतो, तेव्हा तो फक्त वस्तुचे गुणधर्म आणि उपयोगिता विचारात घेतो असे नाही तर त्याचे बाह्यरुप म्हणजे वेष्टणाचा त्यांचा खरेदी निर्णयावर परिणाम होत असतो. त्यामुळे उत्पादकांसाठी औद्योगिक संकल्पचित्र सुद्धा महत्वाचे असते. औद्योगिक संकल्पचित्र म्हणजे वस्तु ज्या वेष्टनामध्ये आहे. त्याचा आकार, रंग संगती, प्रकार आणि विविध प्रकारची चित्रे यांचे सुयोग्य एकत्रीकरण होय. असे संकल्पचित्र औद्योगिक प्रक्रियेने किंवा

साधनांनी वास्तवात उतरविणे, हे सुध्दा बौध्दिक संपदा आहे.

बौध्दिक संपदा हा उत्पादनाचा पाचवा घटक म्हणून भूमिका करीत असल्याने बौध्दिक संपदा या उत्पादन घटकांने समृध्द असलेल्या देशांचे स्थुल देशांतर्गत उत्पादन सुध्दा अधिक असते. या विधानाची सत्यता पडताळणी करण्यासाठी भारत आणि चीन या देशातील बौध्दिक संपदा हक्क संघटनेकडे नोंदणी केलेल्या व्यापार चिन्हांचा आणि स्थुल देशांतर्गत उत्पादनाचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र.३: औद्योगिक संकल्पचित्र आणि स्थुल देशांतर्गत उत्पादन दर्शक तक्ता**

| वर्ष | औद्योगिक संकल्पचित्र | औद्योगिक संकल्पचित्र | भारताचे स्थुल देशांतर्गत उत्पादन (GDP) (अब्ज डॉलर मध्ये) | चीनचे स्थुल देशांतर्गत उत्पादन (GDP) (अब्ज डॉलर मध्ये) |
|---|---|---|---|---|
| २००८ | ५४७८ | ३२८०७५ | ४५३३.१६ | १०५२८.०८ |
| २००९ | ४८८६ | ३६९५९३ | ४९१७.५६ | ११५१७.७० |
| २०१० | ६७३८ | ४४८१२१ | ५४२२.१० | १२७४२.७४ |
| २०११ | ८१७९ | ५६३५३२ | ५७८२.०४ | १३९५७.९४ |
| २०१२ | ७१३७ | ७१७८६३ | ६०९७.५३ | १५०५४.५१ |
| २०१३ | ७००५ | ७६१०२७ | ६४८६.९२ | १६२२२.३१ |
| २०१४ | ८०२१ | ६७३५३८ | ६९६७.६२ | १७४०६.२४ |
| २०१५ | ९२५७ | ७२९५५१ | ७५३५.७८ | १८६०७.३१ |
| २०१६ | ७८८२ | ७९११३८ | ८०७१.७८ | १९८५४.०० |
| २०१७ | १०२५३ | ८५७७५३ | ८६०६.४७ | २१२२३.९२ |

**संदर्भ :** https://www.wipo.int/ipstats/en/statistics/country_profil

वरिल तक्त्यात असे स्पष्ट होते की, भारतातुन नोंदणी झालेल्या औद्योगिक संकल्पचित्राची संख्या २००८ या वर्षी ५४७८ तर चीन मधून नोंदणी झालेल्या औद्योगिक संकल्पचित्र संख्या ४५३३१६ एवढी आहे. याच कालावधीत भारताचे स्थुल देशांतर्गत उत्पादन ४५३३१६ अब्ज डॉलर तर चीनचे १०५२८०८ अब्ज डॉलर आहे. म्हणजे चीन हा देश भारत देशाचा तुलनेने औद्योगिक संकल्पचित्र आणि स्थुल देशांतर्गत उत्पादनात अग्रेसर आहे. २००८ ते २०१७ या संपूर्ण कालावधीत औद्योगिक संकल्पचित्र आणि स्थुल देशांतर्गत उत्पादनाबाबत चीन तुलनेने भारताचे प्रमाण कमी असल्याचे या तक्त्यावरुन स्पष्ट होत आहे.

**भारत बौध्दिक संपदा हक्का बाबत मागासलेलापणाची कारणे :**

१. **भारताची शिक्षण पध्दत :-** भारतातील वर्तमान स्थितील शिक्षण पध्दत ही भारत पारतंत्र्यात असतांना ब्रिटीशानी सुरु केलेली पध्दत आहे. या पध्दतीचे उद्दिष्ट हे कारकून निर्माण करणारे आहे. संशोधक किंवा उद्योजक निर्माण करणे नव्हे.

२. **भारतीयाची शिक्षणाविषयी दृष्टीकोन :** भारतीय लोकांचा शिक्षण हे नोकरी मिळविण्याचे साधन आहे, असा दृष्टीकोन असल्याने नवीन संशोधन करण्याचा प्रयत्न फारसा केला जात नाही.

३. **प्राचीन बौध्दिक संपदा विषयी उदासिनता :** भारतात प्राचिन काळातील बौध्दिक संपदा मोठ्याप्रमाणावर आहे परंतु या प्राचीन बौध्दिक संपदाविषयी उदासिनता असल्याने त्यांची बौध्दिक संपदा हक्कानुसार नोंदणी केली जात नाही. उदा. हळद आणि कडू निंबाचे पेटंट वाद.

४. **बौध्दिक संपदा हक्क कायद्याचा जागृतीचा अभाव :** विकसित देशामध्ये माध्यमिक शिक्षणात बौध्दिक संपदा हक्क कायदाचा समावेश असल्याने तेथील विद्यार्थ्यांनी केलेले संशोधनाचे पेटंट मिळविले जाते. परंतु भारतात औषध निर्माणाशास्त्र, अभियांत्रिक या सारख्या उच्च शिक्षणात बौध्दिक संपदा हक्कांचे शिक्षण दिले जाते. त्यामुळे या कायद्याची योग्य जनजागृती अभाव दिसून येतो.

५. संशोधनासाठी भारतात केंद्र शासन, राज्य शासन आणि नागरीकांकडून केले जाणारे खर्चाचे प्रमाण विकसित देशांचा तुलनेने कमी आहे.

**सारांश :**

भारतने बौध्दिक संपदा हक्कांबाबत चीनच्या तुलनेने कमी प्रमाणात प्रगती केलेली असलेली तरी बौध्दिक संपदा हक्कांबाबत भारताने २००८ ते २०१७ या कालावधीत केलेली प्रगती महत्वाची आहे. तसेच केंद्र सरकारांचे २०१६ चे नवीन बौध्दिक संपदा धोरण,नागरीकांन मधील बौध्दिक संपदा हक्काबाबत वाढती जनजागृती, शासन आणि भारतातील विविध विद्यापीठे यांचे संशोधनाला दिलेले जाणारे प्रोत्साहन, भारतीय समाजाची वाढती संशोधक वृत्ती या सर्व कारणांनी येणाऱ्या काळात बौध्दिक संपदा हक्कांचा माध्यमातुन भारतीय संशोधक आणि उद्योजक भारत या देशाला निश्चितच एक आर्थिक महासत्ता म्हणून नविन विकसित भारत निर्माण करतील.

संदर्भ :


१. दैनिक वृत्तत्र - लोकसत्ता दिनांक - ०७ डिसेंबर २०१८

२. दैनिक वृत्तत्र - लोकसत्ता दिनांक - १२ डिसेंबर २०१८

३. http://www.ipindia.nic.in/history-of-indian-patent-system.htm

४. https://en.wikipedia.org/wiki/Intellectual_property

५. https://www.wipo.int/ipstats/en/statistics/country_profil

६. डॉ. रुपाली शेठ आणि इतर (जून २०१५) व्यवसाय नियामक कायदे इतर डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VII Issue - IV October - December - 2018

MARATHI PART - II / HINDI PART - II

**Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com**

❖ EDITOR ❖

**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"AJANTA"**. Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Published by :**

Ajanta Prakashan, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Cell No. : 9579260877, 9822620877, Ph.No. : (0240) 2400877

E-mail : ajanta1977@gmail.com, www.ajantaprakashan.com

**AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 5.5** **(www.sjifactor.com)**

# EDITORIAL BOARD


**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Nicholas Loannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

**Dr. S. K. Omanwar**
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

**Prof. Joyanta Borbora**
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

**Dr. Walmik Sarwade**
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

**Dr. Manoj Dixit**
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

**Dr. P. A. Koli**
Professor & Head (Retd.),
Department of Economics,
Shivaji University, Kolhapur.

# EDITORIAL BOARD

**Dr. P. Vitthal**
School of Language and Literature
Marathi Dept. Swami Ramanand
Teerth Marathwada University, Nanded.

**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

**Dr. Sadique Razaque**
Univ. Department of Psychology,
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

**Prof. Ram Nandan Singh**
Dept. of Buddhist Studies University of Jammu.



PUBLISHED BY

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | मद्यपान : एक सामाजिक समस्या<br>**डॉ. मधुकर चाटसे** | १-३ |
| २ | अनुसूचित जाती विकासासाठी शासकीय धोरणे आणि योजना<br>**सिंधु गणेश गरुड**<br>**डॉ. कल्पना एच. घारगे** | ४-७ |
| ३ | महिला कौटुंबिक हिंसाचाराची कारणे<br>**सुमन गणेश गरुड**<br>**डॉ. कल्पना एच. घारगे** | ८-१० |
| ४ | बौध्द धम्माच्या ऱ्हासाची कारणे<br>**कल्पना बापूराव वासनिक** | ११-१६ |
| ५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक चिंतन<br>**भवरे क्रांतीदर्शन अशोक** | १७-२१ |
| ६ | रायगड जिल्ह्यातील आंबा लागवड, उत्पादन व उत्पादकता वाढीचा अभ्यास<br>**रसिका रामचंद्र म्हात्रे** | २२-२७ |
| ७ | पिंपळगाव चिलमखाँ येथील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचे चिकित्सक अध्ययन<br>**नरेंद्र हरिभाऊ शेगोकार** | २८-३३ |
| ८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जातीव्यवस्थेविषयक सामाजिक विश्लेषण<br>**श्रीमती शेख जहारा अब्दुल रहिम** | ३४-३६ |
| ९ | प्राचीन भारतातीन गणराज्य आणि लोकशाही प्रक्रिया<br>**प्रा. डॉ. आर. बी. वनारसे** | ३७-४९ |
| १० | भारतातील लोकसंख्येची भविष्यकालीन वाटचाल<br>**प्रा. डॉ. संजय पांडुरंग पाटील**<br>**महाजन प्रविण भास्कर** | ५०-५६ |
| ११ | स्त्री-पुरूष भेद व स्त्रियांच्या हक्कांची पायमल्ली<br>**डॉ. निलेश यु. देशमुख** | ५७-६२ |
| १२ | खेळाडूंच्या कौशल्यवाढीमध्ये एकाग्रता या घटकाची भुमिका<br>**डॉ. किरण व. मोगरकर** | ६३-६८ |

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | झड-झिंबड: एक परीक्षण<br>**प्रा. डॉ. मधुकर बैकरे** | ६९-७३ |
| १४ | आजची आव्हाने आणि महात्मा बसवेश्वरांच्या तत्त्वज्ञानाची प्रस्तुतता<br>**डॉ. उद्धव न. कांबळे** | ७४-७७ |
| १५ | महिलांचे सबलीकरण आणि विकास<br>**प्रा. डॉ. देशमुख आर. के.** | ७८-८४ |
| १६ | शोध कवितेच्या निर्मितीप्रक्रियेचा<br>**डॉ. कैलास सुदामराव वानखडे** | ८५-८७ |
| १७ | मागणी व पुरवठा एक चिकित्सक अभ्यासक<br>**प्रा. टाकोळे दत्तू लक्ष्मण** | ८८-९० |
| १८ | नांदेड जिल्ह्यातील आंबेडकरी पत्रकारिता : ऐतिहासिक अभ्यास<br>**प्रा. महेंद्र यादवराव घनसावंत**<br>**डॉ. प्रकाश वाघमारे** | ९१-९४ |
| १९ | मराठवाड्यातील दलित कथेचे वेगळेपण : एक अवलोकन<br>**प्रा. कांबळे डी. आर.** | ९५-९८ |
| २० | कुसूमाग्रजांच्या प्रेमकवितेतील ध्येयवाद<br>**डॉ. प्रवीण कारंजकर** | ९९-१०४ |
| २१ | बालकाचा शिक्षणाचा अधिकार व राष्ट्रीय बाल नीती<br>**डॉ. प्रा. जयश्री देशमुख** | १०५-१०८ |
| २२ | शिक्षक - प्रशिक्षकांचे ताण - तणाव व्यवस्थापण एक अभ्यास<br>**विद्या आनंदराव शिंदे** | १०९-११४ |
| २३ | नंदुरबार व धुळे जिल्ह्यातील आदिवासी व बिगर आदिवासी शहरी विद्यार्थांच्या दमश्वास या शारीरिक गामक क्षमतेचा तुलनात्मक अभ्यास<br>**डॉ. विजय आधार पाटील**<br>**श्री. प्रमोद जाधव पाटील** | ११५-१२२ |
| २४ | सैनिकी शाळा आणि सद्यस्थितीतील सैनिकी शिक्षणाची गरज<br>**दत्तात्रय महादु पडघान** | १२३-१२६ |

# CONTENTS OF HINDI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | राग : एक अध्ययन<br>**डॉ. अश्विनीकुमार सिंह** | १-४ |
| २ | आध्यात्मिक जीवन रेकी पद्धति के माध्यम से<br>**डॉ. जयश्री बंसल** | ५-९ |
| ३ | शास्त्रीय संगीत में नवसंजीवनी स्वरूप इलेक्ट्रोनिक एवं संचार माध्यमों की भूमिका<br>**सहा. प्रा. सुनिल बाबुलालजी पटके** | १०-१४ |
| ४ | एक पृथक संवैधानिक राज्य के रूप में हिमाचल का गौरवमय संघर्ष<br>**सुमित हुड्डा** | १५-१७ |
| ५ | बाजारवाद एवं वैश्वीकरण के परिप्रेक्ष में 'दौड़' उपन्यास<br>**प्रा. डॉ. प्रमोद गोकुळ पाटील** | १८-२१ |
| ६ | भारत गौरव के पुन: निर्माण में शिक्षकों की भूमिका : एक अध्ययन<br>**अर्पित सुमन टोप्पो** | २२-२६ |
| ७ | कनुप्रिया में प्रेम<br>**प्रा. डॉ. महेंद्रकुमार वाढे** | २७-३१ |
| ८ | शैलेश मटियानी कृत 'हत्यारे' कहानी संग्रह में व्यक्त सामाजिक एवम राजनीतिक चिंतन<br>**डॉ. संजय ढोडरे** | ३२-३५ |
| ९ | व्यायाम का सेहत और तंदुरुस्ती पर होणेवाला परिनाम, एक दृष्टिकोण<br>**डॉ.कालीदास पुंडलिक तादलापूरकर**<br>**डॉ.मुरलीधर शंकरराव राठोड** | ३६-४१ |
| १० | प्रेमचंद के उपन्यासों में चित्रित समस्याओं का अध्ययन<br>**प्राचार्य डॉ. नाना नामदेव गायकवाड** | ४२-४७ |
| ११ | स्वतंत्रता आंदोलन की वेदी पर भारतीय कवियों का योगदान<br>**डॉ. लक्ष्मी गुप्ता** | ४८-५२ |
| १२ | उत्तरशती के हिंदी उपन्यासों में काम-काजी नारी की समस्या<br>**प्रा. डॉ. शेख मुखत्यार** | ५३-५६ |

# CONTENTS OF HINDI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | सोशल मीडिया एवं राष्ट्र निर्माण<br>**डॉ. स्वाती एस.मिश्रा**<br>**रितु त्रिपाठी** | ५७-६१ |
| १४ | नरेश मेहता के आख्यानक काव्यों में मिथक चेतना<br>**प्रा. विजय लोहार** | ६२-६८ |
| १५ | दलित कहानी का उद्‌भव और विकास<br>**निलेश दगडू चाबूकस्वार** | ६९-७४ |

# १०. भारतातील लोकसंख्येची भविष्यकालीन वाटचाल

**प्रा. डॉ. संजय पांडुरंग पाटील**
अर्थशास्त्र विभाग, प. खा. भ. सेवा मंडळ संचलित, कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, देवपुर, धुळे.
**महाजन प्रविण भास्कर**
संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ.

**गोषवारा**

प्राचीन काळात ज्या राष्ट्राची लोकसंख्या अधिक ते राष्ट्र अधिक बलशाली मानले जात होते. कारण उत्पादनासाठी आणि युध्दासाठी अधिक प्रमाणात मानवी संसाधन उपलब्ध होत होते. परंतु या कालावधीत जन्मदर आणि मृत्यदर उच्च असल्याने लोकसख्या वा ढीचे प्रमाण अल्प होते. परंतु दुसऱ्या महायुध्दानंतरच्या कालावधीत विज्ञानआणि आरोग्य सेवाचा विकास झाल्यामुळे मृत्यदरात मोठ्या प्रमाणात घट होण्यास सुरुवात झाली . परंतु साक्षरतेचे अल्प प्रमाण ,दारिद्र्य आणि धार्मिक रुढी व परंपराचा पगडा यामुळे जन्मदरात घट न झाल्याने मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढ झाली.

या अतिरिक्त लोकसंख्या वाढीमुळे भारतासारख्या विकसनशील राष्ट्रात कमी कालावधीत मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढ झाली , या अतिरिक्त लोकसंख्या वाढीमुळे लोकसंख्या राष्ट्रसाठी बलस्थान न ठरतात समस्याचे उगम स्थान ठरु लागले. या लोकसंख्या वाढीमुळे भारतात बेकारी, दारिद्र्य, कुपोषन, इत्यादी समस्या मोठ्या प्रमाणावर निर्माण होऊ लागल्या.

अतिरिक्त लोकसंख्या वाढीला मुख्य कारण असलेला उच्च जन्म दर आणि साक्षरता यांचा व्यस्त संबंध असल्याने साक्षरतेच्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे जन्मदरात घट होत आहे.

कारण साक्षरतेत वाढ लोकाच्या अर्थिक स्थिती सुधारणा (दरडोई उत्पन्नात वाढ), राहणीमानाचा दर्जा सुधारणा आणि आरोग्य विषयक जागृतीचे यांचे प्रतिक आहे. म्हणून साक्षरतेचे प्रमाण विचारात घेवुन भारताच्या लोकसंख्याची भविष्यकालीन वाटचालीचा अभ्यास केला आहे.

**प्रस्तावना**

भारताची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार १२१.०२ कोटी आहे. जगात लोकसंख्याचा बाबतीत चीन नंतर भारताचा दुसरा क्रमांक आहे. भारतात लोकसंख्या वाढ ही एक मोठी समस्या निर्माण झाली आहे. या वाढत्या लोकसख्या मुळे भारतात बेरोजगारी, दारिद्र्य ,कुपोषण, राहणीमानाचा निकृष्ठ दर्जा, गुन्हेगारीचे वाढते प्रमाण या सारख्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत . म्हणजे भारतातील प्रत्येक समस्येचे मुळ कारण वाढती लोकसंख्या हे आहे.

१९०१ मध्ये भारताची लोकसंख्या २३.८४ आणि १९५१ मध्ये ३६.११ कोटी तर २००१ मध्ये १०२.७० या आकडेवारीवरुन से लक्षात येते की भारतात १९०१ नंतर च्या पहिल्या पन्नास वर्षात लोकसंख्या ५१.४६ % वाढली आहे ,तर नंतरच्या पन्नास वर्षात १८४.४० % लोकसंख्या वाढली आहे. भारताला स्वतंत्र प्राप्त झाल्या नंतर लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. कारण १९५१ पुर्वी जन्मदरा प्रमाणेच मृत्यदराचे प्रमाण जास्त होते . १९५१ ला जन्मदर ४१.७ दरहजारी तर मृत्यदर २७.९ दरहजारी इतका होता. स्वातत्र प्राप्ती नंतर अन्नधान्याची मुबलकता , साथीचा रोगावर नियंत्रण,

दळवळण साधनाचा विकास आणि वैद्यकीय क्षेत्राची प्रगती इत्यादी मुळे मृत्यदरात फार मोठी घट झाली . १९५१ या वर्षी २७.९ असलेला मृत्यदर २००१ या वर्षी ८.० पर्यत कमी झाला . परंतु जन्म दरात त्यातुलनेने कमी प्रमाणात घट झाल्याने जन्मदर आणि मृत्यदर यांच्यात मोठ्या प्रमाणात फरक निर्माण झाल्याने भारतात १९५१ ला सुमारे ३७ कोटी असलेली लोकसंख्या २००१ पर्यत १०० कोटी पर्यत आपणास वाढली दिसुन येते . यामुळे जगातील एकुण भु- भाग पैकी २.३६ % क्षेत्रफळ असलेल्या भारत देशात एकूण जागतिक लोकसंख्यापैकी १७ % लोकसंख्या भारतात वास्तव्यास आहे. म्हणजेच भारताची लोकसंख्या उपलब्ध नैसर्गिक साधन संपत्तीच्या तुलनेने अतिरिक्त ठरल्याने भारतात अतिरिक्त लोकसंख्यामुळे निर्माण होणाऱ्या सर्व समस्या भारतात निर्माण होऊ लागल्या .या अतिरिक्त लोकसंख्याची समस्येची जाणीव राज्य कर्ते ,नियोजन कर्त्यांना १९७० नतंर झाल्याने तेव्हा पासुन लोकसंख्या नियंत्रणाचा उपयाची आखणी करुन अमलबंजावणी करण्यास सुरुवात करण्यात आली आहे

सदर लघु शोध निबंधात भारतातील लोकसंख्या वाढीवर परिणाम करणारे घटक , भारतातील लोकसंख्येची वर्तमान स्थितील बदल यांचा अभ्यास आणि भविष्य काळातील लोकसंख्येचा स्थिती विषयी अभ्यास केलेला आहे .

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. सदर संशोधन कार्यात भारताच्या लोकसंख्यातील १९५१ ते २०११ या कालावधीततील लोकसंख्यातील ठळक बदलाचा अभ्यास करणे.

२. भारतातील लोकसंख्यातील बदलावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

३. १९५१ ते २०११ च्या कालावधीतील भारताच्या लोकसंख्यातील बदलाच्या अभ्यास करुन या लोकसंख्येतील बदलाच्या अभ्यास वरून संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर करुनभविष्यकालीन अंदाज वर्तविणे.

**संशोधनाची गृहिते**

१. भारतातील लोकसंख्यावाढीचा दर साक्षरतेचा प्रमाणचा वाढीवर बरोबर कमी होत आहे.

२. भारताच्या लोकसंख्येत २०५० नंतर घट होईल.

**संशोधन पध्दती**

लोकसंख्येतील बदल हा अर्थव्यवस्थेवर परिणाम करणारा अत्यत महत्वाचा घटक आहे. नियोजन कर्त्यांना आणि अर्थशास्त्राचा अभ्यासकांसाठी लोकसंख्येतील बदलाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

सदर शोधनिबंधात भारतातील लोकसंख्येची भविष्यकालीन वाटचालीचा अभ्यास करीत असतांना संपुर्ण माहिती दुय्यम स्त्रोतामधुन घेतली आहे ,यात विविध संदर्भ पुस्तके,शासनाचे अहवाल ,मासिके, इंटरनेट व वर्तमान पत्रे इत्यादीचा वापर करुन दुय्यम माहिती मिळवली आहे . या माहितीवर संख्याशास्त्रीय साधनाचा वापर करुन विश्लेषण केले आहे .

**भारतातील लोकसंख्येतील १९५१ ते २०११ या कालावधीतील महत्वाचे बदल**

भारतातील लोकसंख्येचा भविष्यकालीन वाटचाल अभ्यास करण्यासाठी भुतकाळातील लोकसंख्येतील १९५१ ते २०११ या कालावधीतील लोकसंख्या , दशकातील लोकसंख्येतील वाढ, जन्मदर ,मृत्यदर आणि लोकसंख्येची वाढीचा सरासरी वाढ या घटकांतील बदल अभ्यासने आवश्यक आहे . पुढील तक्त्यात वरील घटकांतील बदल दर्शविलेला आहे.


**भारतातील लोकसंख्येतील महत्वाचा घटकांतील बदल**

| | जनगणना वर्ष | लोकसंख्या | दशकातील वाढ | जन्मदर | मृत्यदर | लोकसंख्या वाढीचा वार्षिक सरासरी दर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९५१ | ३६.११ | १३.३१ | ३९.९ | २७.४ | १.२५ |
| २ | १९६१ | ४३.९२ | २१.६४ | ४१.७ | २२.८ | १.९६ |
| ३ | १९७१ | ५४.८२ | २४.८० | ३६.९ | १४.९ | २.२० |
| ४ | १९८१ | ६८.३३ | २४.६६ | ३३.९ | १२.५ | २.२२ |
| ५ | १९९१ | ८४.६४ | २३.८७ | २९.५ | ९.८ | २.१४ |
| ६ | २००१ | १०२.८२ | २१.५४ | २५.४ | ८.४ | १.९५ |
| ७ | २०११ | १२१.०२ | १७.६४ | २१.८ | ७.१ | १.७६ |

तक्ता क्र -१

वरिल तक्ता क्र.- १ मध्ये भारताच्या लोकसंख्येतील लोकसंख्या ,दशकातील वाढ ,जन्मदर आणि मृत्यदर, लोकसंख्या वाढीचा वार्षिक सरासरी दर या घटकातील बदल दर्शविला आहे. . १९५१ यावर्षी भारताची लोकसंख्या ३६.११ कोटी आहे .तर या दशकात १३.३१ कोटी लोकसंख्या वाढु झाली आहे. यानंतर भारतीय लोकसंख्या सातत्यपुर्ण वाढ होऊन २०११ या वर्षी भारताची लोकसंख्या १२१.०२ कोटी पर्यत वाढ्लेली आहे. ही लोकसंख्या वाढ भारतासाठी मोठ्या प्रमाणात अर्थिक विकासाला अडथळा निर्माण करीत आहे.

तसेच या आलेखात १९५१ ते २०११ कालावधीतील दशकातील लोकसंख्या वाढ दर्शविली आहे .यामध्ये १९५१ ते १९८१ या दशकापर्यत चढत्याक्रमाने अनुक्रमे १३.३१ कोटी ,२१.६४ कोटी, २४.८० या प्रमाणे वाढतांना दिसुन येते .परतु १९९१ ते २०११ या दशकापर्यत दशकातील लोकसंख्या उतरत्या क्रमाने वाढतआहे. ही भारतासाठी समाधारक बाब आहे.




वरिल आलेखात जन्मदर आणि मृत्यदर यातील १९५१ ते २०११ या दशकाचा कालावधीतील बदल दर्शविले आहे. .यामध्ये OY अक्षावर जन्मदर आणि मृत्यदर व OX अक्षावर जनगणाना वर्ष दर्शविलेआहे .

१९५१ मध्ये भारतात जन्मदर ३९.९ आहे .तर १९६१ मध्ये जन्मादरात वाढ जन्मदर ४१.७ पर्यंत वाढलेला आहे. यानंतर च्या दशकात त्यात घट होऊन २०११ पर्यंत जन्मदर २१.८ पर्यंत कमी झाला आहे .या सोबतच १९५१ मध्ये मृत्यदर २७.४ आहे,तर नंतरच्या दशकांत मोठ्या प्रमाणात घट होऊन २०११ पर्यंत ७.१ पर्यंत कमी झाला आहे.

१९५१ ते २०११ या कालावधीत मृत्यदरात मोठ्या प्रमात घट झाली ,परतू तेवढ्या प्रमाणात जन्मदरात घट झाली नसल्याने भारतात लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसुन येते .

या प्रमाणे भारतातील लोकसंख्येतील बदलाचा सक्षिप्त आढावा घेतलेला आहे.

**भारतातील लोकसंख्येचा भविष्यकालीन अंदाज /वाटचाल**

शासन कर्त्यासाठी आणि नियोजन कर्त्यासाठी लोकसंख्येचा भविष्यकालीन अंदाज जाणुन घेणे आवश्यक असतो. भारताची लोकसंख्यावाढीचे मुख्य कारण जन्मदर उच्च असणे ,हे आहे.त्यामुळे जन्मदरावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करुन लोकसंख्येबाबत अंदाज वर्तविण्याचा प्रयत्न या लघुशोध निबंधात केलेला आहे.

**लोकसंख्या वाढीवर परिणाम करणारे घटक**

लोकसंख्यातील वाढ ही जन्मदर आणि मृत्यदर यांच्यातील फरकावर अंवलबून असते. त्यामुळे जन्मदर आणि मृत्यदर याघटकांवर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यासावरुन आपणास भारतीय लोकसंख्येची भविष्यकालीन अंदाज व्यक्त करता येईल.

**जन्मदरावर परिणाम करणारे घटक**

**१. साक्षरातेचे प्रमाण**

साक्षरतेचे प्रंमाण आणि जन्मदर याच्या मध्ये व्यस्त संबंध आहे .हे भारता सारख्या विकसनशील देशाचा लोकसंख्येचा इतिहासाच्या अभ्यास वरुन सिध्द झाले आहे. भारतातील लोकसंख्येवाढ आणि साक्षरतेचे प्रमाण याचा सहसंबध आपणास खालील तक्त्यावरुन लक्षात येईल.

| | **जनगणाना वर्ष** | **साक्षरतेचे प्रमाण** | **जन्मदर (प्रती हजारी )** | **मृत्यदर (प्रती हजारी )** | **लोकसंख्या** |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **१९५१** | **१८.३३** | ३९.९ | **२७.४** | **३८,२२,३१,०४१** |
| **२** | **१९६१** | **२८.३०** | ४१.७ | **२२.८** | **४५,८६,९१,४५७** |
| **३** | **१९७१** | **३४.४५** | ३६.९ | **१४.९** | **५६,६६,०५,४०२** |
| **४** | **१९८१** | **४३.५७** | ३३.९ | **१२.५** | **७१,३५,६१,४०६** |
| **५** | **१९९१** | **५२.२१** | २९.५ | **९.८** | **८८,८५,१३,८६१** |
| **६** | **२००१** | **६४.८३** | २५.४ | **८.४** | **१,०७,१८,८८,१९०** |
| **७** | **२०११** | **७४.०४** | २१.८ | **७.१** | **१,२४,७४,४६,०१०** |
| **पुढील दशकातील साक्षरतेचे प्रमाण सरल रेषीय कल समीकरणाचा साह्याने शोधुन त्या आधारे साक्षरतेचा प्रमाणावरून समाश्रयण विस्लेषण (Regression Analysis) पध्दतीचा वापर करूनजन्मदरातील बदल शोधलेला आहे.** | | | | | |
| **८** | **२०२१** | **८१.९** | **१९.३०** | | |
| **९** | **२०३१** | **९१.१** | १५.९५ | | |
| **१०** | **२०४१** | **१००.३** | १२.७१ | | |
| **११** | **२०५१** | **१००** | ०९.३६ | | |
| **१२** | **२०६१** | **१००** | ०६.२४ | | |

**तक्ता क्रमांक - २**

वरील तक्त्या वरुन असे लक्षात येते की ,भारतात साक्षरतेच्या प्रमाणात ज्या प्रमाणे वाढ होत गेली आहे त्या प्रमाणात जन्मदरात घट होत गेली आहे .कारण साक्षरतेच्या प्रमाणात वाढ होत गेल्याने व्यक्तीला लहान कुंटुबांचे फायदे लक्षात येतात , राहणीमानाची पातळी उच्चवते,अंधश्रध्दा नष्ट होते .इत्यादी कारणानी व्यक्तीचा कल आपल्या कुंटुबांचा आकार लहान ठेवण्याकडे कल निर्माण होत. आहे.

जर भारतात लोकसंख्येची १०० % साक्षरता निर्माण झाली .तर जन्मदर कमी होण्यास मदत होईल.

२०२१ ते २०४१ पर्यतचे साक्षरतेचे प्रमाण हे सरल रेषीय कल समीकरणाचा वापर करुन शोधण्याचा प्रयन्त केला आहे . तर त्या आधारे जन्मदारातील बदल समाश्रयण विस्लेषण (Regression Analysis) पध्दतीचा वापर करुन शोधलेला आहे. यावरुन असे निर्देशानास येते की,भारतात २०११ ला ७४ % असलेली साक्षरता २०४१ ला १०० % असेल तर जन्मदर कमी होण्यास मदत होऊन जन्मदर दर हजारी १२.७१ पर्यत कमी होईल.त्या नंतर च्या कालावधीत साक्षरता १०० % झाल्याने जन्मदर कमी करणाऱ्या अर्थिक स्थिती सुधारणा, वाढते शहरीकरण या घटकांच्या परिणाम होऊन २०५१ मध्ये जन्मदर हा ९.३६ तर २०६१ मध्ये ६.२४ पर्यत कमी होईल यामुळे २०११ या वर्षी असलेला दर हजारी ७.१ असलेल्या मृत्यदरारांशी समानता निर्माण करण्याचा प्रयत्न होईल. सदर विश्लेषणात साक्षरतेचे प्रमाण हे अर्थिक स्थितीतील सुधारणा (दरडोई उत्पन्नातील वाढ), राहणीमानाचा दर्जा,आरोग्य विषयी जागृती सुधारणा इत्यादीचे प्रतिक आहे,म्हणून साक्षरतेचा प्रमाण आणि जन्मदराचा बदलातील सहसंबाधाचा आधारे २०११ च्या दशकातील जन्मदराच्या संख्याशास्त्रीय तंत्राचा आधारे अंदाज व्यक्त केला आहे.

**२. राहणीमानाचा दर्जा**

भारतीय अर्थव्यवस्थेत अर्थिक विकास बरोबर राहणीमानाचा दर्जा उचावंत आहे. राहणीमानाचा दर्जा उंचावल्यानंतर लोकांना उंच राहणीमानाची सवय लागल्या नंतर लोक आपल्या राहणीमानाचा दर्जा कमी होऊ नये म्हणून लोक आपल्या कुंटूबांचा आकार जाणीवपुर्वक कमी ठेवण्याचा प्रयंत्न करतील . यामुळे जन्मदर कमी होण्यास मदत होते .

**३. शहरीकरण**

भारतात १९५१ मध्ये शहरी भागात वास्तव्य करणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण हे फक्त १७.३ %होते . अर्थिक विकासच्या प्रकियेमुळे शहरातील वाढत्या रोजगार संधी निर्माण झाल्यामुळे आणि इतर कारणांनी शहरीलोकसंख्येत २०११ च्या जनगणेनुसार ३१.१६% पर्यत वाढ झाली आहे. येणाऱ्या दशकात यांच कारणांनी शहरीकरणात वाढ होईल. शहरीकरण वाढल्यामुळे विभक्त कुंटूबाचे प्रमाण वाढ होऊन छोट्या कुंटूबाला प्राधान्य मिळुन जन्मदर कमी होण्यास मदत होईल.

**४. बालविहाचे कमी होणारे प्रमाण**

भारतात जन्मदरात वाढ करणारे महत्वाचे कारण बालविवाहाचे अधिक प्रमाण हे होते ,पंरतु वाढती साक्षरता , किमान विवाह वय कायद्याची अंमलबजावणीइत्यादी कारणांनी बालविवाहाचे प्रमाण अत्यंत अल्प आहे .

या उलट आधुनिक जिवनशैलीमुळे विवाहाचा वयात वाढ होत आहे . यामुळे जन्मदर कमी होत आहे.

**५. रुढी, परंपराचा कमी होणारा पगडा**

भारतात रुढी,परंपराचा पगडा असल्याने वंशाला दिवा पाहिजे या हट्टापायी जो पर्यत मुलगा होत नाही तो पर्यत मुली जन्मला येऊ दिल्या जात होत्या ,परंतु साक्षरतेचे प्रमाण वाढल्याने मुलगा मुलगी यातील भेद नष्ट होऊन जन्मदर कमी होत आहे.

**मृत्यदरात वाढ होण्याची कारणे**

स्वातंत्र प्राप्तीनंतर अन्नधान्याची उपलब्धते वाढ ,आरोग्य सुविधामध्ये वाढ,साथीचा रोगावर नियंत्रण इत्यादी कारणांनी १९५१ यावर्षी दर हजारी २७.४ असलेला मृत्यदर २०११ या वर्षी दर हजारी ७.१पर्यत कमी झाला परंतु लोकसंख्याच्या वाढीमुळे १७४८ मध्ये माल्थस या अर्थशास्त्रतज्ञाने इग्लंड च्या वाढत्या लोकसंख्येवर मांडलेल्या आपल्या सिध्दांतात असे प्रतिपादन केले होते की, लोकसंख्येची वाढ भुमिती श्रेणी ने आणि अन्न धान्य उत्पादन गणितीय पध्दत होत असेल तर पुर महापुर ,दुष्काळ ,रोगराई इत्यादी नैसर्गिक आपत्तीने आणि युध्द या सारख्या मानव निर्मिती संकटानी लोकसंख्येत घट होईल . हा माल्थस चा सिध्दांत इग्लंडने औद्योगिक क्रांती आणि आंतराष्ट्रीय व्यापाराच्या साहाय्याने खोटा ठरवला .परंतु भारताचा वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण होणाऱ्या संकटामुळे भारतात माल्थस या अर्थशास्त्रतज्ञचा सिध्दांत लोकसंख्येविषयक सिध्दांत भारतात लागु होण्याची शंका निर्माण झाली आहे .माल्थसचा सिध्दांत भारतात लागु होण्याची आणि मृत्यदरात वाढ होण्याची पुढील प्रमाणे आहेत .

१. **नैसर्गिक आपत्तीत वाढ** - भारतात वाढत्या लोकसंख्यावाढीमुळे जंगलाचे प्रमाण कमी झाले आहे त्यामुळे पर्जन्यमानात अनिश्चितता निर्माण झाली ,यामुळे दुष्काळ आणि महापुर या सारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे मृत्यदरात वाढ होऊ शकते.

२. **आधुनिक राहाणीमान** - भारतात अर्थिक विकासाबरोबर लोकांचे राहणीमानसुध्दा आधुनिक होत आहे .या आधुनिक राहणीमानामुळे लोकांची खाण्या - पिण्याचा सवयी, झोपण्याची वेळ इत्यादीत बदल होऊन डायबिटीज ,कॅन्सर, उच्च रक्तदाब आणि क्षयरोग या शारिरीक आजाराचे प्रमाण वाढुन मृत्यदारात वाढ होऊ शकते.

३. शेतीतील रासायनिक खताचा आणि किटक नाशकांचा वाढता वापर - हरित क्रांतीनंतर भारतात शेतीत उत्पादनात वाढ घडून आणण्यासाठी मोठ्या प्रमाणावर रासायनिक खताचा आणि किटक नाशकांचा वापर वाढल्यामुळे कृषी उत्पादनातुन मानवी शरिरात मोठ्या प्रमाणावर शरिराला अपायकारक ठरणारे रासायनिक द्रव्याचा प्रवेशामुळे विविध आजार निर्माण होऊन मृत्यदरात वाढ होऊ शकते.

४. अन्न पदार्थातील भेसळ - भारता दुध आणि सर्व अन्नपदार्थात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. या भेसळ युक्त अन्न पर्दार्थाचा सेवनाने विविध शारिरीक आजारांच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढ होईल असा अंदाज जागतिक आरोग्य संघटने वेळोवेळी दिला आहे .यामुळे येणाऱ्या कालावधीत मृत्यदरात वाढ होईल.

वरील कारणांन सोबातच वाढ्ते वायु आणि जल प्रदुषणमुळे मृत्यदरात वाढ होऊन २०४१ ते २०६१ या कालावधीत मृत्यदर आणि जन्मदर यांच्या समानता निर्माण होऊन लोकसंख्या वाढ होणार नाही.

**निष्कर्ष**

१. तक्ता क्रमाक - २ वरुन असे स्पष्ट होते की भारतातील लोकसंख्या वाढीवर परिणाम करणाऱ्या उच्च जन्मदराशी व्यस्त संबंध आहे .म्हणजे साक्षरतेचे प्रमाणात वाढीमुळे जन्मदरात घट होत आहे.

२. २०४१ मध्ये साक्षरता १०० % झाल्यावर जन्मदर दर हजारी १२.७१ पर्यत कमी होईल. त्यानंतर जन्मदरात घट होत राहील.

३. अतिरिक्त लोकसंख्या वाढीमुळे माल्थस लोकसंख्या विषयक सिध्दांत भारतात लागु होऊन मृत्यदरात वाढ होईल. त्यामुळे २०४१ ते २०६१ या कालावधीत लोकसंख्या वाढ थांबेल.

४. २०६१ पर्यत भारताच्या लोकसंख्येचे आकारमान कमी होणार नाही .त्यामुळे मोठ्या आकारमान असलेल्या लोकसंख्येचे दुष्परिणाम म्हणजे बेकारी ,दारीद्र्य , प्राथमिक सुविधावर ताण , जिवनावश्यक वस्तुच्या किंमतीतील वाढ थांबणार नाही.

५. मृत्यदरात वाढ झाल्याने मानवी संसाधात केलेली गुतवंणुक वाया जाईल.

**संदर्भ**

1. http://mr.vikaspedia.in/

२. डॉ.आर.के.दातीर आणि इतर, “२०१०’ “भारतीय अर्थव्यवस्था”,निराली प्रकाशन,पुणे.

३. प्रा.डॉ.राजेंद्र अ. रसाळ, “२०१३” “भारतीय अर्थव्यवस्था”, सक्सेस प्रकाशन,पुणे

४. डॉ.किरण जी. देसले, “२०१५”“अर्थिक व सामाजिक विकास” दिपस्तंभ प्रकाशन,जळगाव.

५. प्रा. राम देशमुख “ २००५” “मूलभूत सांख्यिकी”विद्या प्रकाशन,नागपुर

६. http://www.alcula.com/calculators/statistics/linear-regression/